# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 14 October 2024
# Time 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- महिला आर्थिक सक्षमीकरणाला सरकारचं प्राधान्य - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन
- राज्याच्या कायदा–सुव्यवस्थेवर महाविकास आघाडीच्या नेत्यांची टीका
- बाबा सिद्दीकी हत्येप्रकरणी एका आरोपीला २१ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी

आणि

- जायकवाडी आणि येलदरी धरणातून विसर्ग, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

****

महिला आर्थिक सक्षमीकरणाला सरकारचं प्राधान्य असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. नांदेड इथं महिला सशक्तिकरण मेळाव्यात ते काल बोलत होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेची रक्कम टप्प्याटप्प्यानं वाढवणार असून, आचारसंहितेमुळे दोन महिन्यांचे पैसे आगाऊ दिल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले,

> ***''आम्ही तेहतीस हजार कोटीची व्यवस्था केली फक्त माझ्या लाडक्या बहिणींच्या योजनेसाठी. तुमचे हे भाऊ दीड हजारावर थांबणार नाहीत. तुम्ही ताकद दिली, बळ दिलं, शक्ती दिली, आशीर्वाद दिले तर दीडाचे दोन हजार होतील. दोनाचे अडीच हजार होतील. तुम्ही अजून बळ दिलं तर अडीचचे तीन हजार पेक्षा जास्त होतील.''***

लाडकी बहीण योजनेसह कोणत्याही कल्याणकारी योजना बंद होणार नाहीत, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. या योजनेबद्दल अपप्रचार केल्याबद्दल त्यांनी विरोधकांवर टीका केली. वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देणारी अन्नपूर्णा योजना, मुलींना मोफत शिक्षण अशा योजनांचा उल्लेख करत या योजना म्हणजे महिलांना कायमस्वरुपी ओवाळणी आहे, असं त्यांनी सांगितलं. युवकांना भत्त्यासह प्रशिक्षण देणारं देशातलं महाराष्ट्र हे पहिलंच राज्य असल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. खासदार अशोक चव्हाण, आमदार बालाजी कल्याणकर यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, उत्तर नांदेड विधानसभा मतदार संघातल्या विविध विकासकामं, प्रकल्पांचं, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमीपूजन तसंच लोकार्पण करण्यात आलं. यामध्ये हनुमान गड परिसरातल्या राजमाता जिजाऊ सृष्टीचं लोकार्पण, कुसुम सभागृहासमोर पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकाचं भूमीपूजन, पावडे वाडी नाका परिसरातल्या कृषी महाविद्यालयाच्या इमारतीचं भूमीपूजन, वाडी उपजिल्हा रूग्णालयाच्या मुख्य इमारतीचं तसंच परिचारिका वसतिगृहाचं भूमीपूजन, पिपल्स आणि सायन्स कॉलेज परिसरातल्या कै. नरहर कुरूंदकर यांच्या स्मारकाचं भूमीपूजन, आदी कामांचा यात समावेश आहे.

****

मुंबईत चर्नी रोड इथं उभारण्यात येणाऱ्या `मराठी भाषा भवन`चं भूमिपूजन काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. मराठी भाषेच्या संवर्धन आणि विकासासाठी मुंबईत होत असलेलं हे मराठी भाषा भवन उत्तम आणि दर्जेदार व्हावं, असं सांगून भाषा भवनाच्या माध्यमातून मराठी भाषा अधिक समृद्ध आणि प्रगल्भ करण्यासाठी अधिक जोमाने काम करूया, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

नवी मुंबईत वाशी इथं सायन - पनवेल महामार्गावरच्या, मुंबई-पुणे या उत्तर वाहिनी मार्गिकेचं लोकार्पण, तसंच रेवस-रेडी सागरी महामार्गावरच्या सात खाडी पुलांच्या कामांचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल झालं.

****

दरम्यान, मुख्यमंत्री शिंदे आज जालना जिल्हा दौर्यावर येणार असून, घनसावंगी तालुक्यातल्या कुंभार पिंपळगाव इथं शेतकरी मेळाव्याला ते संबोधित करणार आहेत. ब्यू सफायर फूड प्रोसेसिंग युनिट दोन चं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन होणार आहे.

****

देशाच्या राजकारणात महाराष्ट्राच्या प्रशासनाचा एक वेगळा दबदबा होता, मात्र सध्याच्या सरकारनं हा नावलौकिक धुळीला मिळवला आहे, अशी टीका, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केली आहे. राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी काल मुंबईत पत्रकार परिषद घेतली, त्यावेळी ते बोलत होते. राज्य सरकारनं गेल्या दोन तीन महिन्यात अनेक निर्णय घेतले, या निर्णयांची अंमलबजावणी होणं शक्य आहे का, असा सवाल त्यांनी केला. राज्यात सुरक्षेचा बोजवारा उडाला असून, महिलांवर अत्याचार होत आहेत, राजकीय नेते सुरक्षित नाहीत मग जनतेच्या सुरक्षेचं काय, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. तर शासकीय माध्यमातून राजकीय भाषणं होत आहेत, हे अयोग्य आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. दरम्यान, या नेत्यांनी यावेळी 'गद्दारांचा पंचनामा' प्रसिद्ध करत भ्रष्टयुतीविरुध्द आरोपपत्र जारी केलं.

****

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी मुंबई पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे. तर तिसरा आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. गुरमैल सिंग आणि धर्मराज कश्यप या दोन आरोपींना काल किल्ला न्यायालयासमोर हजर करण्यात आलं. त्यापैकी गुरमैल सिंग याला येत्या २१ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली, तर धर्मराज कश्यप याच्या वयाची चाचणी झाल्यानंतर त्याला पुन्हा हजर करण्याचे आदेश न्यायालयानं पोलिसांना दिले आहेत.

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेची १५ पथकं सर्व बाजूंनी या प्रकरणाचा तपास करत असून, अन्य राज्यांच्या पोलिसांची मदतही घेण्यात येत आहे, अशी माहिती गुन्हे अन्वेषण शाखेच्या अधिकाऱ्यांनी काल वार्ताहर परिषदेत दिली. कुख्यात बिष्णोई टोळीचा या हत्येत सहभाग असल्याचे समाजमाध्यमावरचे संदेश प्रसारित झाले आहेत, त्या संदेशाच्या सत्यतेविषयीही तपास सुरू असल्याचंही पोलिसांनी स्पष्ट केलं.

****

दरम्यान, बाबा सिद्दीकी यांच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर मुंबईत कोणतीही टोळी पुन्हा सक्रीय होणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

यांनी पोलिसांना केल्या आहेत. बाबा सिद्दीकी यांच्या पार्थिवावर काल मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

२६ नोव्हेंबर रोजी संविधानाला ७५ वर्ष पूर्ण होत असून, यानिमित्त केंद्र सरकारच्या वतीनं प्रत्येक गावात संविधान गौरव अभियान राबवण्यात येणार असल्याची माहिती, केंद्रीय अल्पसंख्याक आणि संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी दिली. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. प्रत्येक जिल्ह्यात संविधान भवन उभारण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. संविधानात बदल करण्यात येणार असा अपप्रचार काही घटकांकडून होत आहे, या अपप्रचाराला बळी पडू नका, असं आवाहन रिजीजू यांनी केलं.

****

केंद्र सरकारच्या योजना माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अखत्यारितील माध्यमांद्वारे नागरिकांपर्यंत योग्यरित्या पोहोचवल्या जात आहेत, असं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी सांगितलं. नागपूर इथं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत विविध प्रसार माध्यमांच्या अधिका-यांच्या आढावा बैठकीनंतर ते बोलत होते. या वेळी पत्र सूचना कार्यालय, केंद्रीय संचार ब्यूरो, दूरदर्शन आणि आकाशवाणीचे अधिकारी उपस्थित होते. विदर्भातल्या सर्व संस्थामध्ये उपलब्ध असलेल्या पायाभूत सोयी-सुविधांबाबत या आढावा बैठकीत चर्चा करण्यात आली.

****

महिला टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल भारताला ऑस्ट्रेलियाकडून नऊ धावांनी पराभव पत्करावा लागला. प्रथम फलंदाजी करत ऑस्ट्रेलियाच्या संघानं निर्धारित षटकात आठ बाद १५१ धावा केल्या. प्रत्यूत्तरादाखल भारतीय संघ नऊ बाद १४२ धावाच करु शकला. या विजयामुळे ऑस्ट्रेलियाचा संघ उपान्त्य फेरीत दाखल झाला असून, भारताची उपान्त्य फेरीत प्रवेशाची आशा, आता न्यूझीलंड आणि पाकिस्तान दरम्यानच्या सामन्यावर टिकून आहे. पाकिस्तानने हा सामना जिंकला तर भारताला उपान्त्य फेरीत स्थान मिळेल.

****

राज्यात अनेक भागात परतीचा पाऊस सुरु असून, काही धरणांमधून पुन्हा एकदा पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे.

हिंगोली जिल्ह्यात येलदरी धरणाचे दोन विद्युत जनित्रे सुरु करून एक हजार ८०० घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याचा विसर्ग पूर्णा नदीपात्रात सोडण्यात आला. परिणामी सिद्धेश्वर जलाशयाच्या पाणीपातळीत वाढ होत असल्यानं, धरणाचे चार दरवाजे उघडून पाच हजार ५० घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने नदीकाठच्या गावांना सावधानतेचा इशारा दिला आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथल्या जायकवाडी धरणाच्या चार दरवाजातून दोन हजार ९६ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याचा विसर्ग सुरु आहे. धरण पूर्ण भरलं असून, सध्या तीन हजार ७२ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याची आवक होत आहे.

धुळे जिल्ह्यात परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे पुन्हा एकदा नद्या नाले दुथडी भरून वाहत आहेत. तसंच पांझरा नदी वरील अक्कलपाडा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरु असल्याने अक्कलपाडा धरणातून सहा हजार ९६२ घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाणी सोडण्यात येत आहे.

बुलडाणा जिल्ह्यातही मलकापूरसह अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. त्यामुळे जलसाठ्यांमध्ये वाढ होत आहे. नळगंगा प्रकल्पातून ९७७ घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाणी सोडण्यात येत आहे.

पुढचे दोन दिवस कोकणासह मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात कळंब इथल्या शासकीय तंत्रज्ञान संस्था – आयटीआयला संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांचं, धाराशिव आयटीआयला भाई उद्धवराव पाटील यांचं आणि तुळजापूर इथल्या आयटीआयला शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरूजी यांचं नाव देण्यात आलं आहे. या तिन्ही संस्थांच्या नामफलकाचं अनावरण काल आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आलं.

****

लातूर जिल्ह्यात उदगीर इथं होणार्या पहिल्या राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आहिल्यादेवी होळकर विद्यापीठातल्या वृतपत्र विद्या विभागाचे माजी प्रमुख, ज्येष्ठ पत्रकार डॉ. रविंद्र चिंचोलकर यांची निवड झाली आहे. मुख्य संयोजक बिभीषण मद्देवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. या संमेलनाचे उद्घाटक म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख

यांची, तर स्वागताध्यक्षपदी राज्याचे क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांची निवड करण्यात आली आहे. उदगीर शहरातल्या रघुकूल मंगल कार्यालयात येत्या २० ऑक्टोबरला हे एकदिवसीय पत्रकार साहित्य संमेलन होणार आहे.

****